आर.सी.सी.क्र. २५/२०२२
सरकार वि.मंगेश
नि.क्र. १२

**<u>सरकार पक्षाचा साक्षीदार क्रं ०१ यांचा शपथेवर जबाब</u>**

**माझे नांव** : अजिंक्य सुधाकरराव बंड,
**माझे वय** : **३१** वर्ष, **व्यवसाय :** शेती,
**राहणार** : खरवाडी, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती.

**<u>सरकार पक्षातर्फे सरतपास श्री– वानखडे, सहा. सरकारी वकील यांचेमार्फत</u>** :–

१. मी आरोपीस ओळखतो, तो आज न्यायालयात हजर आहे. घटना ही दिनांक ०९.१२.२०२१ रोजी रात्री ०७.०० ते ०८.०० वाजताचे सुमारास माझे घरी घडली हाती. त्यावेळी आरोपीने माझे घराचे बाहेर अंगणात ठेलेलेल्या सोयाबीनचे पोत्यातुन ५० किलो सोयाबीन चोरुन नेले होते. त्यानंतर आरोपी सोयाबीन चोरुन नेत असताना माझा चुलत भाउ मनिष याने आरोपीस पाहिले व त्याने लगेच पाच ते दहा मिनीटांनी मला सांगीतले. त्यानंतर दुस–या दिवशी आम्ही आरोपी मंगेश यास विचारपुस केली असता त्याने उडवाउडवीचे उत्तरे केली. म्हणुन मी पोलीस स्टेशनला तक्रार केली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद व छापील प्रथम खबरी अहवालावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **<u>नि.क्रं. १३ व १४</u>** देण्यात आला. माझे चोरी गेलेले सोयाबीन मला पोलीस स्टेशन मधुन परत मिळाले आहे व ते परत मिळाल्याबाबत मी स्टॅम्पवर लिहुन दिले होते, आता मला सदरचा स्टॅम्प दाखविला असता त्यावर माझी सही आहे, त्यास **<u>नि.क्रं. १५</u>** देण्यात येतो.

**<u>उलट तपास आरोपीतर्फे ॲड– श्री ए. बी. वासनकर यांचेमार्फत</u>** :

२. हे म्हणणे खरे आहे की माझे राहाते घर चां.बाजार ते अमरावती या मुख्य रस्त्यावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घरालाच लागुन माझी शेती आहे. मी सन २०२० ते

२०२१ मध्ये मी माझे शेतामध्ये सोयाबीनची पेरणी केली होती त्याबाबतचे दस्ताऐवज पोलीसांना दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०९.१२.२०२१ रोजी माझे घराचे दुस–या मजल्याचे बांधकाम चालु होते. हे म्हणणे खरे आहे की आरोपी हा माझेकडे गवंडी कामासाठी मजुर म्हणुन काम करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०९.१२.२०२१ रोजी माझेघरी कुठलीही चोरीची घटना घडली नाही त्यामुळे मी त्या दिवशी चोरीचा रिपोर्ट दिला नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी माझे घराला संरक्षक भिंत होती. हे म्हणणे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्षात पाहिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी आरोपीकडुन माझे घरातुन चोरी गेलेले सोयाबीन जप्त केले नाही. हे मला माहित नाही की, नि.क्रं. १५ प्रमाणे मला पोलीसांनी दिलेले सोयाबीन हे पंकज निंभोरकर कडुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील कथन खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे माझेकडे गवंडी कामाचे पैसे होते, ते बुडविण्यासाठी मी खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास– नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. २३.११.२०२२

**(जी.एम.नदाफ)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, न्यायालय क्रं.०१,
चांदुर बाजार.

आर.सी.सी.क्र. २५/२०२२
सरकार वि.मंगेश
नि.क्र. १६

**सरकार पक्षाचा साक्षीदार क्रं ०२ यांचा शपथेवर जबाब**

**माझे नांव** : राजेश रामभाउ अढाउ,
**माझे वय** : **३६** वर्ष, **व्यवसाय :** शेती,
**राहणार** : खरवाडी, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती.

**सरकार पक्षातर्फे सरतपास श्री– वानखडे, सहा. सरकारी वकील यांचेमार्फत** :–

१. मी आरोपीस ओळखतो, तो आज न्यायालयात हजर आहे. तसेच, मी फिर्यादीस ओळखतो. दि. १३.१२.२०२१ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी अजिंक्यचे घरी बोलाविले होते. सदरचा पंचनामा हा चोरीबाबतचा होता आता मला दाखविण्यात आलेल्या घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं. १७** देण्यात आला. .

**उलट तपास आरोपीतर्फे ॲड– श्री ए. बी. वासनकर यांचेमार्फत** :

२. हे म्हणणे खरे आहे की माझे फिर्यादीसोबत चांगले संबंध आहेत.हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने मला दि. १३.१२.२०२१ रोजी घरी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांचे सांगण्यावरुन मी पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मला पोलीसांनी पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. मला फिर्यादीचे घर क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा वाचला नसल्यामुळे मला घर क्रमांक माहित नाही. फिर्यादीकडे घटनेच्या सुमारास १०० पेक्षा अधीक सोयाबीनचे पोते होते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याचेवेळी माझे समक्ष सोयाबीनच्या पोत्यांचे मोजमाप करण्यात आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष पंचनामा करण्यात आल्याचे मी खोटे सागत आहे. हे म्हणणे

खरे  नाही की, फिर्यादीसोबत चांगले संबंध असल्याने मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास– नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. २३.११.२०२२

**(जी.एम.नदाफ)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, न्यायालय क्रं.०१,
चांदुर बाजार.

आर.सी.सी.क्र. २५/२०२२
सरकार वि.मंगेश
नि.क्र. १८

<u>**सरकार पक्षाचा साक्षीदार क्रं ०३ यांचा शपथेवर जबाब**</u>

**माझे नांव** : पंकज सुभाषराव निंभोरकर
**माझे वय** : **३८** वर्ष, **व्यवसाय :** शेती,
**राहणार** : खरवाडी, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती.

<u>**सरकार पक्षातर्फे सरतपास श्री– वानखडे, सहा. सरकारी वकील यांचेमार्फत**</u> :–

१. मी आरोपीस ओळखतो, तो आज न्यायालयात हजर आहे. तसेच, मी फिर्यादीस ओळखतो. दि. २०.१२.२०२१ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी आरोपीच्या घरी बोलाविले होते. सदरचा पंचनामा हा सोयाबीन चोरीबाबतचा होता. त्यावेळी आरोपीने माझे समक्ष त्याचे घराचे मागच्या छपरीमध्ये लपवुन ठेवलेले सोयाबीन काढुन दिले होते व त्याबाबतचा पंचनामा माझे समक्ष करण्यात आला. सोयाबीन तेथे ठेवल्याचे माझे व पोलीसांचे समक्ष आरोपीने सांगीतले होते. आता मला आरोपीचे निवेदन दाखविण्यात आले, त्यावर माझी, आरोपीची व पोलीसांची सही आहे, सदरचे निवेदन माझे समक्ष नोंदविण्यात आले. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास <u>**नि.क्रं. १९**</u> देण्यात येतो. आता मला दाखविण्यात आलेल्या शोध पंचनाम्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास <u>**नि.क्रं. २०**</u> देण्यात आला. .

<u>**उलट तपास आरोपीतर्फे ॲड– श्री ए. बी. वासनकर यांचेमार्फत**</u> :

२. पोलीसांनी मला पंचनामेसाठी दि. २०.१२.२०२१ रोजी बोलाविले होते. मला पोलीसांनी त्याकरीता लेखी समन्स दिले नव्हते. चोरीची घटना ही दि. ०९.१२.२०२१ रोजीची होती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला पोलीसांकडुन जे सोयाबीन मिळाले होते ते

मीच पोलीसांना दिले होते. पंचनाम्यावर माझे व्यतिरीक्त  मुकेश वासनीक यांची सही घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगीतल्याप्रमाणे निवेदन अगर शोध पंचनामा माझे समक्ष झाल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे  नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास– नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. २३.११.२०२२

**(जी.एम.नदाफ)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, न्यायालय क्रं.०१,
चांदुर बाजार.